# पदभरती निवेदन

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर परिमंडळ कोल्हापूर.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर, ०२ रा मजला, मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयाजवळ, कसबा बावडा रोड, कोल्हापूर ४१६००३ येथे विविध संवर्गातील रिक्त पदांची, कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत आहेत.

सदरील पदभरती जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, अर्जाचा नमुना, नियम, अटी व शर्ती हया राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई येथील संकेतस्थळ (www.nrhm.maharashtra.gov.in & www.arogya.maharashtra.gov.in) वर प्रसिध्द करण्यात आलेले असून, उमेदवारांनी संकेतस्थळावरुन अर्जाचा नमुना Download करुन, जाहिरातीतील आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह अर्ज समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने अथवा कुरिअरने पाठविणेसाठी या निवेदनाव्दारे आवाहन करण्यात येत आहे.

सही/-
उपसंचालक,
आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ
कोल्हापूर.

# जाहिरात नमुना सन २०२२-२३

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यांत येणाऱ्या कार्यक्रमांसाठी कोल्हापूर महानगरपालिका व सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली यांचेकडील रिक्त असलेल्या खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर (११ महिने २९ दिवसाकरिता) खालील पदांसाठी अर्ज मागविण्यात करणेत येत आहे.

### कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर

| अ. क्र. | पदाचे नांव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | आवश्यक अनुभव | नियुक्तीचे ठिकाण | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेषतज्ञ स्त्रीरोगतज्ञ | ०१ | MD/ MS Gyn / DGO / DNB | खुला ७० वर्षापर्यन्त | ७५,०००/- | शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | कोल्हापूर महानगरपालिका कोल्हापूर | SC-१ ST-१ OBC-१ EWS-१ |
| | विशेषतज्ञ भुलतज्ञ | ०२ | MD Anesthesia / DA / DNB | | | | | |
| | विशेषतज्ञ बालरोगतज्ञ | ०१ | MD Paed / DCH / DNB | | | | | |
| २ | पुर्णवेळ वैद्यकिय अधिकारी | ४ | M.B.B.S MCI/MMC कॉन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | सर्वसाधारण ७० वर्षापर्यन्त | ६०,०००/- | तत्सम् पदाचा शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | | ST-१ OBC-१ EWS-१ Open-१ |
| ३ | अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी | स्त्रीरोगतज्ञ-५ बालरोगतज्ञ-६ | MD/ MS Gyn / DGO / DNB MD Paed / DCH / DNB | सर्वसाधारण ७० वर्षापर्यन्त | २०००/- प्रति दिवस भेट | तत्सम् पदाचा शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | | बिदूनामावली लागु नाही |

### सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली

| अ. क्र. | पदाचे नांव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | एकत्रित मानधन | आवश्यक अनुभव | नियुक्तीचे ठिकाण | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेषतज्ञ भुलतज्ञ | ०१ | MD Anesthesia / DA / DNB | खुला ७० वर्षापर्यन्त | ७५,०००/- | शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका सांगली | SC-१ |
| २ | पुर्णवेळ वैद्यकिय अधिकारी | ०१ | M.B.B.S MCI/MMC कॉन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | | ६०,०००/- | | | EWS -१ |
| ३ | अर्धवेळ वैद्यकिय अधिकारी | ०३ | M.B.B.S MCI/MMC कॉन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | | ३०,०००/- | | | बिदूनामावली लागु नाही |
| ४ | स्टाफ नर्स | १० | GNM/ B.Sc Nursing व MNC Registration अनिर्वाय आहे. | खुला प्रवर्गासाठी ३८ वर्षापर्यत व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षापर्यत | २०,०००/- | तत्सम् पदाचा शासकिय, निमशासकिय अनुभव असल्यास प्राधान्य | | ST-१ VJ-A-१ NT-B-१ NT-C-१ EWS-२ Open-४ |

वरील प्रमाणे रिक्त असलेल्या निव्वळ कंत्राटी पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करणेत येत आहे. तरी इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती व छायांकित केलेल्या साक्षांकित प्रतीसह उपरोक्त नमुद केलेल्या रिक्त पदांसाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दि.१५/११/२०२२ पासुन ते दिनांक :-२५/११/२०२२ रोजी सकाळी

१०.०० वाजेपासुन ते ५.०० वाजेपर्यंत (सुटटीचे दिवस वगळून) स्विकारण्यात येतील " तसेच दिनांक :- २५/११/२०२२ नंतर आलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. ई.मेलद्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :- उपसंचालक आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ कोल्हापूर, दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकिय इमारत एस.पी.ऑफिसजवळ, कसबा बावडा रोड, कोल्हापूर ४१६००३

अटी व शर्ती -

१) खुल्या प्रवर्गातील उमेदवांरासाठी रु १५०/- व राखील प्रवर्गातील उमेदवारांसाठी १००/- धनाकर्ष (Demand Draft ) जोडणे आवश्यक आहे. सदरचा धनाकर्ष (Demand Draft ) Deputy Director Of Health Services Kolhapur Circle Kolhapur या नावाने काढावा. धनाकर्ष (Demand Draft ) राष्ट्रीयकृत बॅंकेचा आसावा.

२) उपरोक्त नमुद केलेले पद ११ महिने २९ दिवस कंत्राटी तत्वावर कराराद्वारे भरणेत येत आहे. सन २०२३-२४ च्या कृती आराखडयामध्ये सदर पदांची मंजुरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा आपोआप संपुष्टात येईल. परंतु वरील पद सन २०२३-२४ मध्ये मंजुर झाल्यास पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देण्यात येईल.

३) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाहीत.

४) सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे क्र.राआसो/मनुष्यबळ/आरक्षण /२४५६४-७७४/१६ दि. २०/०७/२०१६ रोजीच्या पत्रानुसार आवश्यक असणा-या आरक्षित सवंगातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणा-या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

५) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

६) सर्व पदांसाठी उमेदवारांनी सर्व शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, तसेच पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष), पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणूण (१० व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (सांक्षाकिंत / स्वसांक्षाकिंत) जोडावीत. नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ज ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

७) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

८) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.

९) अर्ज सादर करणेकामी व मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१०) पुर्णवेळ वैद्यकिय अधिकारी व विशेषतज्ञ पदासाठी सुचना - पुर्णवेळ वैद्यकिय अधिकारी व विशेषतज्ञ या पदासाठी अर्ज उपलब्ध न झालेस इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती व सांक्षाकित केलेल्या छायांकित प्रतीसह थेट मुलाखतीसाठी प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या मंगळवारी सदरील मुलाखती घेणेत येईल. तसेच सदर दिवशी सुटटी असल्यास पुढील दिवशी (बुधवारी) मुलाखती घेणेत येतील याची नोंद घ्यावी.

११) सदर रिक्त पदांच्या संख्येत, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ कोल्हापूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१२) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१३) मागासवर्गीय उमेदवारानी अर्ज आरक्षणामधून सादर करावयाचा असल्यास, अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहिल.

१४) अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास, उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१५) मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

१६) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

१७) अर्जदारांनी एका पेक्षा जास्त पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र धनाकर्ष असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदारांनी कोणत्या पदासाठी अर्ज केला व कोणत्या महानगरपालिकेसाठी अथवा कार्यक्षत्रासाठी अर्ज केला आहे त्याचा उल्लेख सोबत जोडलेल्या अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

सही/-
(डॉ.दुर्गादास पांडे)
अध्यक्ष तथा
उपसंचालक आरोग्य सेवा
कोल्हापूर मंडळ,कोल्हापूर

# कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना

## राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक, आरोग्य सेवा कोल्हापूर मंडळ कोल्हापूर .

| पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वताः साक्षांकित करुन लावावे करावा |
|---|

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र:-

प्रति,
मा. उपसंचालक आरोग्य सेवा,
कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर

**पदाचे नावः** -----------------------------------

**पद स्थापना कार्यक्षेत्र** ............................

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव :- ----------------------------------------------

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नांव :- ----------------------------------------------

३) जन्म तारीख :- वर्ष .............. महिना .............. दिवस ............

अक्षरी --------------------------------------
--------------------------------------

वय :- .......... वर्ष पुर्ण, ............महिने, ........ दिवस
(जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी )

४) राहण्याचा पत्ता :- ----------------------------------------------------
----------------------------------------------------
----------------------------------------------------

(मोबाईल क्र.:- ........................................) (नमुद करणे अनिवार्य)

(ई मेल **ID**.:- ..................................................)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :- होय/नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय/नाही जातीचा प्रवर्ग :- ------------------

जातीचे नाव :- ------------------

- अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग :- ------------------

(नमुद करणे अनिवार्य)

७) धनाकर्ष क्रमांक व दिनांक व रक्कम :-

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही :- आहे/नाही

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी.

| अ. क्रं. | काम केलेलया कार्यालयांचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्षे | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१)...................................... २)......................................

३)...................................... ४)......................................

५)...................................... ६)......................................

७)...................................... ८)......................................

९)...................................... १०)......................................

१५) वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा अणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेलया सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- कोल्हापूर स्वाक्षरी :- ..................................

दिनांक :- / /२०२२ अर्जदारांचे नांव:- --------------------------